मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.६९२१/२०१७ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ०८.०६.२०२६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने नुकसानभरपाई रक्कम अदा करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय, क्रमांकः न्यायप्र २०२६/प्र.क्र.२६१/रुशआ-१

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२६.

वाचा :

१) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दाखल रिट याचिका क्र.६९२१/२०१७ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ०६.०६.२०२६ रोजी दिलेल्या आदेश

२) शासकीय अभियोक्ता, मा. उच्च न्यायालय,मुंबई यांनी दिनांक १७.०६.२०२६ रोजी दिलेले आदेश

३) अतिरिक्त संचालक (आरोग्य संस्थेमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम) आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र क्र. आआसे/माआ/टे-४/रिट पी ६९२१-२०१७/७४९८-७५०३/२६ दि. ०१.०७.२०२६.

प्रस्तावना:

वैद्यकिय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे यांनी शमशुद्दीन सवाजी भनवाडीया या रुग्णास प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे येथे नोंदणी क्र.१३४५४ नुसार दिनांक १९/११/२०१३ रोजी रात्री ७ वाजुन २० मिनिटांनी मानसिक आजारावरील उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथे दिनांक २०/११/२०१३ रोजी श्री. शमशुद्दीन भानवडीया व अन्य रुग्णांमध्ये झालेल्या भांडणात रुग्णांना केलेल्या मारहाणीत श्री. शमशुद्दीन भानवडीया या रुग्णाचा मृत्यू झाला होता.

०२. त्यानुसार कै. शमशुद्दीन सावजी भानवाडीया यांची पत्नी श्रीमती नूरजहाँ शमशूद्दीन भनवाडीया यांनी सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन व अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे व

इतर विरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये या रुग्णालयांमध्ये त्यांचे पतीचा दुस-या रुग्णाच्या हल्यात मृत्यू झाल्याने त्याबाबत नुकसान भरपाई मिळणे करीता रिट पिटिशन क्र.६९२१/२०१७ दाखल केली होती

०३. आता रिट पिटिशन क्र.६९२१/२०१७ दिनांक ०८/०६/२०२६ रोजी पिटीशनर श्रीमती नूरजहाँ शमशुद्दीन भनवाडीया यांचे बाजुने नुकसान भरपाई देणेबाबत अंतिम निकाल प्राप्त झाले असुन प्रतिवादी क्र.१ यांच्या पतीच्या निधनाबद्दल आर्थिक नुकसान भरपाई म्हणुन याचिकाकर्त्यांना रु.२२,००,०००/- (अक्षरी रु. बावीस लक्ष फक्त) देण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित केले. यामध्ये मृत रुग्ण कै. शमशुद्दीन सावजी भानवडीया यांची वारसदार पत्नी श्रीमती नूरजहाँ शमशुद्दीन भनवाडीया याचिका क्र.१ यांना एकुण रक्कम रु. २२,००,०००/- (अक्षरी रु. बावीस लक्ष फक्त) अदा करण्यास मान्यता देण्याबाबतचा उपरोक्त प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

रिट पिटिशन क्र. ६९२१/२०१७ दिनांक ०८/०६/२०२६ रोजी पिटीशनर श्रीमती नूरजहाँ शमशुद्दीन भनवाडीया यांचे बाजुने नुकसान भरपाई देणेबाबत अंतिम निकाल प्राप्त झाले असुन प्रतिवादी क्र.१ यांच्या पतीच्या निधनाबद्दल आर्थिक नुकसान भरपाई म्हणुन याचिकाकर्त्यांना रु.२२,००,०००/- (अक्षरी रु. बावीस लक्ष फक्त) देण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सदर रक्कम मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जमा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

०२. सदर प्रस्तावातील खर्च मागणी क्रमांक आर-१, २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य (०६) सार्वजनिक आरोग्य, (००१) संचालन व प्रशासन, (०१) सह संचालक आरोग्य सेवा,पुणे भारीत (०१) (०१) सहसंचालक आरोग्य सेवा पुणे (अनिवार्य) उप शिर्ष ५०- इतर खर्च (२२१०४५१५) या मुख्य लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

०३. उपरोक्त रक्कम मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जमा करण्यासाठी वैद्यकीय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर आहारण व संवितरण अधिकारी यांनी उपरोक्त नुकसानभरपाईची रक्कम तसेच न्यायालयाने आदेशित केल्यानुसार अचूक परिगणना करुन सदर रक्कम विहित प्रक्रिया पार पाडून मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जमा करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

०४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८,भाग पहिला, उपविभाग-दोन मधील महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार अ.क्र.२,नियम क्र.७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२४१२२८२६७९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH N THAKUR

Digitally signed by NILESH N THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=415734ca36f54c5d4cb5456e84a92d5e5613f1fe9da979b6482793320aaee667, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B09FE15FF6B6C8375746423BEF519EF1586BC313B0643A825D248D608D572ED2, cn=NILESH N THAKUR
Date: 2026.08.24 17:17:29 +05'30'

(निलेश ठाकूर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल- १ / २, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. अतिरिक्त संचालक (आरोग्य संस्थेमार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम) आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
५. उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे.
६. सह संचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालये राज्यस्तर), मुंबई.
७. अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
९. वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
१०. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
११. निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).